भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०४/२०१७

**१) संगनमत करुन माहेरून पैसे घेवुन ये या कारणावरून मारपिट,जिवाने मारण्याचा प्रयत्न करून गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

माहे ८/१६ ते दि.०७/०४/२०१७ पर्यत यातील फिर्यादी सौ.रिंकु उर्फ छाया मनोज ऊके वय २४ वर्ष, हिचे जाती रिवाजा प्रमाने लग्न सन २०१५ मध्ये आरोपी क्र. १ सोबत झाले असुन सन २०१६ पासुन फिर्यादीचे मुलीस घर बांधण्यासाठी ५०,०००/रू. आपले वडीलाकडुन घेवुन ये असा आरोपी क्र १ ते ४ चार यांनी तगादा लावुन फिर्यादीचे मुलीस मारपीट करून शारीरीक व मानसिक त्रास देवुन दि.०७/०४/२०१७ ला आरोपी क्र. १ ते २ व ४ यांनी संगनमत करून माहेरून ५०,०००/रू. घेवुन ये या कारणावरून फिर्यादीचे मुलीस थापडबुक्यांनी मारपिट करून व डोक्याचे केस ओढुन भिंतीवर आपटुन गंभिर जखमी करून जिवाने मारण्याचा प्रयत्न करून फिर्यादीचे मुलीचे सिटीस्कॅन रिपोर्ट व फिर्यादी अबिरदास मंगलदास रामटेके वय ७० वर्ष रा. आसोली पोस्टे. गोदिंया यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३०७,४९८(अ),३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि वर्मा पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

**२) घराचा ताला तोडुन कपाटातील सोन्याचे दागीने व पैसाची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०४/२०१७ चे २०.०० ते २२. वा. दरम्यान यातील फिर्यादी हात्याचे पत्नी सहे भिम जंयती रैली पाहण्याकरिता घराला कुलुप लावुन गेला असता कुणीतरी अज्ञात चोराने सुनो मौका पाहुन फिर्यादीचे घराचे समोरील दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून कपाटात ठेवलेली ०३ ग्रॅम सोन्याची नथ, ०६ ग्रॅम कानातील सोन्याचे झुमके, १२ तोडे चांदीच्या पायपटटया,०३ ग्रॅम सोन्याची अंगठी,०७ ग्रॅम सोन्याचे डोरल्याची गाठी, डिजीटल ०१ कॅमेरा व नगदी २,०००/रू. असा एकुन ४४,८००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी निलकंठ चंद्रभान अंबादे वय ४५ वर्ष रा. ईदीरा गांधी वार्ड, मेंढा भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) घराची लाकडी लोखंडी खिडकी अर्धवट तोडुन लाकडी कपाटातील सोन्या, चांदीचे दागीन्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०४/२०१७ चे २१.१५ ते २२. ३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा आपले मुलासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर जंयती रैली पहाण्याकरिता गेला असता कुणीतरी अज्ञात चोराने सुनामौका पाहुन घराचे मागील लाकडी लोखंडी खिडकी अर्घवट काढुन आत प्रवेश करून घरातील लाखंडी आलमारी मध्ये ठेवलेली ०५ ग्रॅम सोन्याची काळी पोत,१० ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र, ०४ ग्रॅम सोन्याचे कानातील झुमके, ०६ ग्रॅम सोन्याच्या २ अंगठया, ०२तोडे चांदीचे पायपटटया असा एकुन ५९,०००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी सुरेश दिलबहादुर परदेशी वय ३० वर्ष रा. कस्तुरबा गांधी वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. फुंडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयितरित्या मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०४/२०१७ चे ०३.४० ते ०४.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी हे आपले पोलीस स्टॉपसह चेकींग व पेट्रोलींग करित असता यातील आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने आपले अस्थित्व लपवुन मोटार सायकलने फिरतांना संशयितरित्या मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनि रायपुरे वय ४१ वर्ष पोस्टे भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १२२ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

५) लाच स्विकारतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १५/०४/२०१७ चे १४.३० वा. दरम्यान यातील आरोपीने तक्रारदार यास त्याचे माहे मार्च २०१३ ते जानेवारी २०१५ पर्यतचे निलबंन कालावधीत प्रलंबीत असलेले थकीत वेतनबिल मंजुर करून दिल्याचा मोबदला म्हणुन ३०,०००/रू.लाचेची रक्कम पडताळनी करून सापडा कारवाही दरम्यान तडजोडीअंती २५,०००/रू. लाचरक्कम स्विकारल्याने सरतर्फे फिर्यादी पोनी. पारधी एसीबी. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ७,१३(१)(ड),१३८२)ला.प्र.का.१९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. पारधी एसीबी. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) जामा मस्जिद येथील इसमाचा अचानक मृत्यु :–

दिनांक १५/०४/२०१७ चे ०३.०० वा. दरम्यान यातील मृतक नौशाद गफार शेख वय २५ वर्ष, रा. आझाद वार्ड तुमसर येथे मागील ०५ वर्षा पासुन इमाम म्हणुन काम करत होता मृतक हा जामा मस्जिद तुमसर येथे झोपला असता अचानक मरण पावल्याची माहीती मृतक याचे घरच्या लोकांना मिळाल्याने मृतकचे आई वडील व भाऊ यांनी घटनास्थळी प्रेत पाहुन झाल्यावर पुढील कारवाही करिता मृतकचे लाहान भाऊ फिर्यादी सलमाने गफार शेख वय २३ वर्ष रा. आझादवार्ड तुमसर याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि.सोनपीपरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे.

७) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक १५/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे लाखांदुर येथे अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १० लिटर हा. भ. दारू किंमती ५०० /–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १५/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.